ePaper

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर? आज सर्वोच्च फैसला**

| वर्ष - 9 | अंक -95 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- एकट्या प्रशिक्षकाला दोष देणे अयोग्य!
- अभिनेत्रीने क्रिकेटपटूशी केलं लग्न
- पत्रकार राणा अय्युब यांना धमकी!
- कर्नाटकात ‘एकनाथ शिंदें’चा प्रयोग?


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 28 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**अतिवृष्टी, वादळ-वाऱ्यांचा धोका : समुद्रातून येत आहे विध्वंसकारी चक्रीवादळ**

# देशासह महाराष्ट्रातही हवामान अलर्ट जारी!

## ३० नोव्हेंबरला उत्तर तामिळनाडू–दक्षिण आंध्र किनारपट्टीला जोरदार धडक

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**भारतीय हवामान विभागाने (IMD) देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि चिंताजनक इशारा जारी केला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याने आता चक्रीवादळाचे रूप धारण करण्याची शक्यता प्रबळ असून, ३० नोव्हेंबर रोजी हे वादळ उत्तर तामिळनाडू – दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकणार आहे. समुद्रातून येणारे हे चक्रीवादळ दक्षिण भारतात तीव्र पावसासह मोठा तडाखा देऊ शकते. महाराष्ट्राला तुलनेने हलका परिणाम होणार असला तरी कोकणात वादळ-वाऱ्यांसह पावसाची शक्यता नाकारता येत नाही. हवामान विभागाचे हे अलर्ट गंभीर असून, पुढील ४८–७२ तास देशासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.**




> “भारतात मोठा चक्रीवादळ इशारा •
> बंगालच्या उपसागरात हवामानातील तीव्र बदल
> • तामिळनाडू–आंध्र प्रदेशात रेड/यलो अलर्ट
> • महाराष्ट्रातही हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता
> • नागरिकांनी घराबाहेर पडताना सावधानता बाळगावी
> • ३० नोव्हेंबरला वादळ किनारपट्टीला धडकेल
> • 70–80 किमी/ता वेगाचे वारे शक्य”

वादळाच्या उंबरठ्यावर असलेले हे हवामान स्थितीचे संकट लक्षात घेऊन, सामान्य नागरिकांनी पुरेशी सावधगिरी बाळगणे अत्यावश्यक आहे.

### चक्रीवादळाची मोठी चाहूल; हवामान विभागाचे तातडीचे अलर्ट

या वादळाचा प्रभाव दक्षिण भारतात सर्वाधिक दिसेल, मात्र महाराष्ट्रातील कोकण, दक्षिण महाराष्ट्र आणि काही अंतर्गत भागांमध्ये पावसाचा प्रभाव जाणवेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

### नोव्हेंबरमध्ये हवामानाचा अद्भुत पलटवार

गत दोन आठवड्यांपासून देशात हवामान सतत बदलत आहे—
काही दिवसांपूर्वी अचानक आलेला पाऊस,
नंतर पडलेली तीव्र थंडी,
आणि आता पुन्हा एकदा पावसाचा मोठा इशारा.
हवामानातील या सततच्या बदलाने नागरिकांसोबत आरोग्य तज्ज्ञही सजग झाले आहेत. वाढलेले वायू प्रदूषण, उकाड्याची अवेळी चाहूल आणि वातावरणातील अस्थिरता यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे.

### बंगालच्या उपसागरात तयार झाले ‘नवे संकट’

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार—
दक्षिण-पश्चिम बंगालचा उपसागर
श्रीलंकेच्या किनारपट्टीनजीक
एक नवीन चक्रीवादळसदृश्य ‘गंभीर परिसंस्था’ तयार होत आहे.
हे कमी दाबाचे क्षेत्र १७ किमी/ता वेगाने उत्तर-पश्चिम दिशेला सरकत असून पुढील २४–४८ तासांत चक्रीवादळात रूपांतरित होईल, अशी शक्यता आहे.

**वादळ सक्रिय झाल्यानंतर—**

70–80 किमी/तास वादळी वारे,
मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा धोका,
खाड्यांमध्ये भरतीची तीव्रता वाढणे,
समुद्र खवळण्याचा धोका
अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.
दक्षिण भारतातील किनारपट्ट्यांसाठी अलर्ट जारी— रेड आणि यलो अलर्ट लागू

IMD ने तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पुदुचेरीसाठी अलर्ट जारी केले आहेत.

**प्रभावित होणारे प्रमुख जिल्हे —**
चेन्नई, कांचीपुरम, तिरुवल्लूर, विलुप्पुरम
नेल्लोर (AP), चित्तूर (AP)

या जिल्ह्यांत अतिवृष्टी, पूर परिस्थिती, वादळ-वाऱ्यांमुळे झाडे, खांब उन्मळण्याचा धोका व्यक्त केला आहे. नागरिकांना घराबाहेर पडताना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे तसेच आपत्कालीन सेवांच्या सूचना पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
आंध्र प्रदेशात 2–3 दिवस मुसळधार पाऊस
वादळाचे केंद्रबिंदू आंध्र–तामिळनाडू सीमेलगत असल्याने आंध्रच्या किनारी भागात—
मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस

### जोरदार वारे

समुद्र खवळण्याचा उच्च धोका
अशी स्थिती दिसणार आहे. मच्छीमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
महाराष्ट्रावर वादळाचा अप्रत्यक्ष परिणाम
महाराष्ट्रावर चक्रीवादळाचा थेट फटका नाही, परंतु त्याचा परिघीय परिणाम जाणवेल.

### कोणत्या भागात पाऊस अपेक्षित?

कोकण, दक्षिण कोकण (रत्नागिरी–सिंधुदुर्ग) , दक्षिण महाराष्ट्र, पुणे, सोलापूर, सातारा येथे ढगाळ वातावरण
काही भागांत हलका ते मध्यम पाऊस
कोकण किनारपट्टीवर ३० नोव्हेंबरपर्यंत सोसाट्याचा वारा सुटेल, अशी शक्यता वर्तवली आहे.

प्रभागात ७३ हजार मतदार

## मृत्यूनंतरही मतदार यादीत आजीचे नाव


# तब्बल 10 हजार मतदारांची फेरफार ?

## प्रारूप मतदार यादी अनेक त्रुटी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत अनेक त्रुटी असून, प्रभाग क्रमांक २२ मध्ये ३ हजार ६०० दुबार मतदार आणि मतदारसंघाबाहेरील ५ हजारपेक्षा अधिक नावे असल्याचा दावा काँग्रेसचे माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. यादीमध्ये दुरूस्ती न झाल्यास चक्का जाम आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.**



बागवे म्हणाले,'महापालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादी अनेक त्रुटी आहेत. काशेवाडी डायस प्लॉट या प्रभागात ७३ हजार मतदार आहेत. या प्रभागातील मतदार यादीची प्राथमिक तपासणी केल्यानंतर मोठा घोळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यादीत एकाच पानावर एकाच व्यक्तीचे नाव चार वेळा आहे. दुबार-तिबार नावे असलेल्या मतदारांची संख्या ३ हजार ६०० आहे. केवळ एकच नाव असलेले ओळख न पटणारे अनेक मतदार यादीमध्ये नोंदवण्यात आले आहेत. काही मतदारांची नावे, पत्ता आणि वयही एकसारखेच आहे.''मतदार यादीतील त्रुटींमुळे सुमारे १० हजार मतदारांवर परिणाम होऊन मतदानाची टक्केवारी घसरू शकते. त्यामुळे मतदार यादीत जाणीवपूर्वक अनियमितता करण्यात आली आहे का, याची तपासणी करणे गरजेचे आहे,' असेही त्यांनी नमूद केले. मतदारांची फेरफार करण्यात येत असल्याचा आरोप करत बागवे म्हणाले,'यादीत नव्याने समाविष्ट करण्यता आलेले पाच हजारपेक्षा अधिक मतदार हे मतदारसंघाबाहेरील आहेत. सत्ताधारी पक्षाला फायदा व्हावा म्हणून ही फेरफार करण्यात येत आहे.'दरम्यान, प्रभाग २२ मधील संपूर्ण मतदार यादीची पडताळणी करून दुरुस्तीनंतरच अंतिम मतदार यादी जाहीर करावी आणि याद्यांमध्ये झालेल्या फेरफाराच्या चौकशीसाठी विशेष तपासणी पथक नेमण्याची मागणीही बागवे यांनी केली. याद्यांमध्ये दुरूस्ती न झाल्यास चक्का जाम आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.आजी आणि चुलत्यांचा मृत्यू झाल्यानंतर मतदार यादीतून त्यांचे नाव वगळण्यासाठी वारंवार अर्ज केले होते. मात्र, लोकसभा-विधानसभेच्या निवडणुका होऊनही त्यांची नावे वगळण्यात आलेली नाही,' असे अविनाश बागवे यांनी सांगितले. प्रभाग क्रमांक २२च्या मतदार यादीत बाराशे मृत मतदार प्राथमिक तपासणीत आढळल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षातून बाहेर वगळण्याचा

### 'यादीत बाराशे मृत मतदार'

मतदारांची फेरफार करण्यात येत असल्याचा आरोप करत बागवे म्हणाले, 'यादीत नव्याने समाविष्ट करण्यता आलेले पाच हजारपेक्षा अधिक मतदार हे मतदारसंघाबाहेरील आहेत. सत्ताधारी पक्षाला फायदा व्हावा म्हणून ही फेरफार करण्यात येत आहे.'दरम्यान, प्रभाग २२ मधील संपूर्ण मतदार यादीची पडताळणी करून दुरुस्तीनंतरच अंतिम मतदार यादी जाहीर करावी आणि याद्यांमध्ये झालेल्या फेरफाराच्या चौकशीसाठी विशेष तपासणी पथक नेमण्याची मागणीही बागवे

प्रयत्न काहींनी केला. मात्र, आम्ही काँग्रेसमध्येच आहोत.

अखेरपर्यंत काँग्रेसमध्येच राहणार आहोत. आमच्या पक्षात लोकशाही आहे. पक्षात इतक्या मोठ्या प्रमाणात नेते, कार्यकर्ते आणि पदाधिकारी आहेत. त्यामुळे मतभेद होत असतात. महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत अनेक त्रुटी असून, प्रभाग क्रमांक २२ मध्ये ३ हजार ६०० दुबार मतदार आणि मतदारसंघाबाहेरील ५ हजारपेक्षा अधिक नावे असल्याचा दावा काँग्रेसचे माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. यादीमध्ये दुरूस्ती न झाल्यास चक्का जाम आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. बागवे म्हणाले,'महापालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादी अनेक त्रुटी आहेत. काशेवाडी डायस प्लॉट या प्रभागात ७३ हजार मतदार आहेत. या प्रभागातील मतदार यादीची प्राथमिक तपासणी केल्यानंतर मोठा घोळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यादीत एकाच पानावर एकाच व्यक्तीचे नाव चार वेळा आहे. दुबार-तिबार नावे असलेल्या मतदारांची संख्या ३ हजार ६०० आहे. केवळ एकच नाव असलेले ओळख न पटणारे अनेक मतदार यादीमध्ये नोंदवण्यात आले आहेत. काही मतदारांची नावे, पत्ता आणि वयही एकसारखेच आहे.''मतदार यादीतील त्रुटींमुळे सुमारे १० हजार मतदारांवर परिणाम होऊन मतदानाची टक्केवारी घसरू शकते. त्यामुळे मतदार यादीत जाणीवपूर्वक अनियमितता करण्यात आली आहे.

# निधीचे वाटप दृष्टिकोन चांगला नाही

## अर्थकारण' आणणे योग्य नाही: शरद पवार यांची सत्ताधारी पक्षांवर टीका

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'राज्य सरकारमधील सत्ताधारी पक्षांकडून केलेल्या विकासकामाच्या जोरावर नव्हे; तर निधीचे वाटप करून निवडणुकीत मते मागण्यासाठी चढाओढ सुरू आहे. मतांसाठी असे 'अर्थकारण' आणून निवडणुका जिंकायच्या हा दृष्टिकोन चांगला नाही,' अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली.**



शरद पवार हे बारामती दौऱ्यावर असून, गोविंदबाग येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पवार म्हणाले,'सध्या मते मागताना निधीचे वाटप केले जात आहे. त्यासाठी चढाओढ सुरू आहे. विकासकामांच्या जोरावर मते मागितली जात नाहीत, ही गोष्ट चांगली नाही. निवडणुकांमध्ये अर्थकारण आणून निवडणुका जिंकायच्या, या दृष्टिकोनावर न बोललेले बरे.'राज्य शासनाने कर्ज वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल पवार म्हणाले, 'अतिवृष्टी, पूरस्थितीमुळे राज्याच्या काही भागांत नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जमीन वाहून गेली आहे. बाधितांना आर्थिक मदत दिली जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र, राज्य सरकारने मागील वर्षाच्या कर्जाच्या वसुलीला एक वर्षासाठी स्थगिती दिली आहे. सरकारने नुकसानीची रक्कम द्यायला हवी होती. काही

### 'स्थानिक निवडणुकांमध्ये नसतो'

शरद पवार म्हणाले.नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांच्या प्रचाराला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या आठवड्यात बारामतीतील माळेगाव बुद्रूक नगरपंचायत आणि बारामती नगरपरिषदेपासून सुरुवात केली. त्या वेळी झालेल्या प्रचार सभांमध्ये उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामतीसाठी आतापर्यंत किती निधी दिला, हे सांगताना 'मते द्या, निधी घ्या' असे वक्तव्य केले. 'बारामतीसाठी दरवर्षी सरासरी ३५० कोटी रुपये देत आलो आहे. २०२२ पासून आतापर्यंत १९४५ कोटी रुपयांचा निधी बारामतीसाठी आणला आहे.

रकमेसाठी व्याज माफ करून हप्ते करून दिले असते तर शेतकऱ्यांना त्याची मदत झाली असती.''यापूर्वी देशातील अनेक नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकारण आणू नये, अशी भूमिका घेतली होती. मीदेखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राजकारण आणत नाही. मात्र, सध्या स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत ठिकठिकाणी गट झाले आहेत. एक गट दुसऱ्या पक्षाबरोबर निवडणुका लढवत आहे. याचा अर्थ परस्परांमध्ये एकवाक्यता नाही.

**नदी सुधार प्रकल्प** — महानगरपालिका प्रशासनाकडून प्रकल्पाला गती

# ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध!

## आमदार महेश लांडगे यांचा “ड्रीम प्रोजेक्ट” दृष्टीक्षेपात

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडकरांसह तमाम वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना मिळाली असून, महानगरपालिका प्रशासनाने निविदा प्रसिद्ध केली आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-2020’ या अभियानामध्ये ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानंतर 2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा चर्चेत राहिला. राज्य शासनाची पर्यावरण समिती आणि राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी हा प्रकल्प प्रलंबित होता.

दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासाठी सकारात्मक सहकार्य केले. त्यानंतर विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता देण्यासाठी सर्वोतोपरी निर्णय घेतला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने आता निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी आवश्यक असलेल्या ‘इस्टिमेंट कमिटी’समोर हा विषय ठेवला होता. त्याला मान्यता देण्यात आली. त्यानंतर आता निविदा प्रसिद्ध केली आहे. पहिल्या टप्प्यात 526 कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या MASTER PLAN मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे. तसेच, WATER ATM, PUBLIC TOILET, STREET FURNITURE, CHAIN LINK FENCING COMPOUND WALL आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या अमृत- 2 उपक्रमांतर्गत या प्रकल्पाचे काम होणार आहे.

> “इंद्रायणी नदी केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही, तर आपली संस्कृती, पर्यावरण आणि शहराच्या आरोग्याशी थेट जोडलेली जीवनवाहिनी आहे. नदी सुधार प्रकल्पाची निविदा प्रसिद्ध झाली. ही प्रक्रिया पूर्ण करून डिसेंबर- 2025 पासून या प्रकल्पाचे काम सुरू होईल, असा विश्वास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे यासाठी आभार व्यक्त करतो. या प्रकल्पाद्वारे इंद्रायणी नदीला नवजीवन मिळेल, प्रदूषणमुक्त व सुरक्षित किनारे तयार होतील, तसेच नागरिकांना हरित व सुंदर नदीकाठाचा अनुभव मिळेल. आम्ही हा प्रकल्प वेळेत व गुणवत्तेने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# तळेगाव दाभाडेतील मतदारांच्या हक्कांवर पाणी !

## नगर परिषदेच्या तब्बल 19 जागांवर उमेदवार बिनविरोध; 37 हजार 698 मतदार मतदानापासून वंचित

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“तळेगाव दाभाडे (प्रतिनिधी): तळेगाव नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी तळेगाव दाभाडेमध्ये तब्बल १९ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे ३७ हजारापेक्षा जास्त उमेदवारांना मतदानाचा हक्क बजावण्याची संधी मिळू शकणार नाही. केवळ ४४.५० टक्केच मतदार मतदान करू शकतील.निवडणूक निर्णय अधिकारी गिरीश दापकेकर यांनी ही माहिती दिली. या निवडणूकीसाठी दोन डिसेंबर रोजी मतदार होणार आहे.**





दरम्यान नगराध्यक्ष पदासाठी मात्र सर्व ६४,६७६ जण मतदान करू शकतात. त्यासाठी तीन उमेदवार रिंगणात आहेत. नगर परिषदेत एकूण जागा २८ आहेत. बिनविरोध निवडीमुळे ११ प्रभागांतील दोन्ही नगरसेवकांच्या मतदानापासून ३७,६९८ मतदार वंचित झाले आहेत. तीन प्रभागांत एका जागेवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे तेथील १३,०४१ मतदारांना फक्त एकाच मताचा अधिकार मिळणार आहे. इतर तीन जागांवर मतदान होणार आहे. १३,९३७ मतदारांना सर्व पदांसाठी दोन नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष अशी तीन मते देता येतील. जवळपास ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर तळेगाव नगरपरिषदेची निवडणूक होत आहे. निवडणुकीसाठी तळेगावकरांनी मोठ्या उत्साहाने मतदानाचीही तयारी केली होती. पण, या निवडणुकीत तब्बल १९ जागा बिनविरोध झाल्याने ३७ हजार मतदारांचे मतदानाचे स्वप्न धुळीला मिळाले आहे.

बिनविरोध निवडीमुळे नगरसेवकपदाच्या उमेदवारांना आता मतदान करता येणार नाही. लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होण्याची हीच संधी अनेकांसाठी हरपली गेली आहे. नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी-भाजप युतीचे उमेदवार, भाजपचे माजी शहराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील, अपक्ष उमेदवार, माजी उपनगराध्यक्ष किशोर भेगडे, माजी नगराध्यक्ष ॲड. रंजना भोसले हे आपले नशीब आजमावत आहेत.

### नगराध्यक्षपदासाठी मतदान करता येणार

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेमध्ये एकूण मतदारसंख्या ६४ हजार ६७९ तर एकूण मतदारसंख्या ६४,६७९ आहे. ३५,९०१ मतदार नगरसेवकपदाच्या मतदानापासून वंचित राहणार आहेत. हे प्रमाण ५५.५० टक्के आहे. ४४.५० टक्के मतदारांना नगरसेवकांना मतदान करता येणार आहे. नगराध्यक्षपदासाठी तीन उमेदवार रिंगणात असल्याने सर्व ६४,६७९ मतदारांना नगराध्यक्षपदासाठी मतदान करता येणार आहे.

# कौशल्ययुक्त शिक्षणाकडे झेप!





## भूमिका

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांचा सलग सातवा अर्थसंकल्प सादर करून स्थापन केलेला विक्रम अभिनंदनास पात्र ठरतो; कारण सलग सात वर्षे मांडले गेलेल्या अर्थसंकल्पांमध्ये एक प्रकारचे सातत्य दिसते. त्याचे प्रतिबिंब यंदाच्याही अर्थसंकल्पात पडलेले दिसते.**

देशापुढील आव्हानांचाही विचार झालेला दिसेल. येत्या दहा वर्षांत होणारे औद्योगिक उत्पादन, त्याच्या गरजा ओळखून, युवकांना अर्थार्जन करण्याचे नवीन मार्ग त्यांनी उपलब्ध करून दिले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांशीदेखील हा अर्थसंकल्प सुसंगत ठरतो, तो कसा हे पाहू. आज जर १४ ते १६ वयोगटातल्या युवकांचे कौशल्य बघितले तर आपल्याला आश्चर्य व वाईटही वाटेल. सन २०२३ चा 'असर' (ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) अहवाल सांगतो की, या वयोगटातील युवकांना इयत्ता दुसरीच्या मुलांकडून जे वाचणे अपेक्षित असते तेसुद्धा वाचता येत नाही. याचा अर्थ असा की, त्यांना एक तर त्यात गती नाही किंवा त्यांना ते ज्ञान उपयोगी वाटत नाही. त्यामुळे त्यांचा कल प्रत्यक्ष रोजगार मिळवून देईल अशा शिक्षणाकडे आहे. त्यांना प्रत्यक्ष रोजगार मिळवून देणाऱ्या कौशल्यआधारित शिक्षणाकडे जावेसे वाटते. हे ओळखून व तीच देशाची गरज आहे हे पाहून अर्थसंकल्पात यंदा जी १.४८ लाख कोटींची तरतूद आहे. त्यात देशभरातील २० लाख युवकांना येत्या पाच वर्षांत कुशल करण्यासाठी १००० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना बळकट करण्याचा व त्यासाठी अर्थपुरवठा करण्याचा मानस निश्चितच स्वागतार्ह आहे. त्याचे दुसरे परिमाण असे की, देशाच्या औद्योगिक गरजा लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम या औद्योगिक प्रशिक्षण संस्था करणार आहेत. त्याने बेरोजगारी वर आणि देशाच्या कौशल्य समस्यांवर ('स्किल क्रायसिस'वर) उपाय मिळण्यास निश्चित मदत होईल. दुसरी महत्त्वाची तरतूद म्हणजे कौशल्य अर्जित करणाऱ्या आणि शिकाऊ उमेदवारांना सरकार भरघोस विद्यावेतन देणार आहे. त्यासाठी नियोक्ता व कर्मचारी या दोघांनाही सरकार मदत करणार आहे. त्यात सामाजिक सुरक्षासुद्धा अंतर्भूत राहणार आहे. नियोक्त्याला त्यांनी भरलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेच्या प्रमाणात अनुदान मिळणार आहे. एक कोटी तरुणांना देशातल्या ५०० प्रमुख उद्योगांमध्ये अंतर्वासिता (इंटर्नशिप) देण्याची व त्यांना दरमहा रु. ५००० व एकरकमी रु. ६००० देण्याची तरतूदसुद्धा युवकांच्या बदलत्या आकांक्षा लक्षात घेता योग्य आहे असे वाटते. असर २०२३ चा अहवाल सांगतो की, महाविद्यालयीन स्तरावरच्या १६.२ टक्के मुलांचा, कमी मुदतीचे म्हणजे सहा महिन्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे कल आहे. अर्थसंकल्पातील या तरतुदीचा अशा युवकांना निश्चितच फायदा होईल असे वाटते. महत्त्वाचे म्हणजे या अभ्यासक्रमांसाठी लागणारे शिक्षण शुल्क भरण्यासाठी सरकारने दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्ष साडेसात लाख रु.पर्यंतच्या कर्जाची तरतूद केली आहे. तसेच ज्यांना उच्च शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी भारतीय संस्थांत प्रवेश घेतल्यास १० लाख रु. इतक्या कर्जाची सोय दरवर्षी एक लाख विद्यार्थ्यांसाठी केली आहे. यामुळे ज्यांना कौशल्य अर्जित करून लगेच उत्पन्न कमवायचे आहे त्यांची, तसेच ज्यांना उच्च शिक्षित व्हायचे आहे त्यांची, अशा दोघांचीही सोय झाली आहे असे वाटते. दुसरे म्हणजे, उद्योगांनासुद्धा कमी कौशल्याचे तसेच अधिक कौशल्याचे अशा दोन्ही गटांत मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. प्रधानमंत्री पोषण आहार योजना' वाढवून त्यासाठी केलेल्या तरतुदीचे महत्त्व देशाच्या शहरी व समृद्ध भागांतील लोकांना कदाचित समजणार नाही. परंतु गडचिरोली अथवा तत्सम भागांतील रहिवाशांसाठी याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. घरातील एक व्यक्ती शाळेत जाणे म्हणजे दोन कमावते हात कमी होणे होय. त्यामुळे पालक त्यांना शाळेत घालत नाहीत किंवा शाळेतून काढून घेतात. मुले शाळाबाह्य होतात. भुकेचा प्रश्न मिटल्यास पालक त्यांना शाळेत जाऊ देण्यास तयार होतात असा अनुभव आहे. अर्थसंकल्पातील प्रधानमंत्री पोषण आहार योजनेसाठीची १२,४६७ कोटी रुपयांची तरतूद मागील तरतुदीपेक्षा ८६७ कोटी रुपयांनी जास्त असणे अतिशय आश्वासक आहे.

## असे कसे

### उकळी कशी आणायची?

***कोणीही म्हणेल, की हे कसं काय शक्य आहे? पाण्याला उकळी आणण्यासाठी काही जादू थोडीच करायची आहे?***

'आला गेला जादू मंतर छू' असं म्हणायचं, की लागलंच ते पाणी उकळायला! पण अशी जादू वगैरे काहीही करण्याची आवश्यकता नाही. पाण्याच्या किंवा खरं तर कोणत्याही द्रवपदार्थाच्या, नैसर्गिक गुणधर्मांचाच वापर करत पाण्याला उष्णतेशिवाय उकळी आणणं शक्य आहे. पाणी हे निसर्गात बर्फ म्हणजे घन, वाहतं पाणी म्हणजे द्रव आणि वाफ म्हणजे वायू अशा तिन्ही अवस्थांमध्ये अस्तित्वात असतं. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जेव्हा ते जातं तेव्हा त्याच्या रेणूंच्या एकमेकांशी असलेल्या बंधनांवर काही परिणाम होत असतात. जेव्हा ते द्रवरूपात असतं तेव्हा त्याचे रेणू एकमेकांना घट्ट जवळ करून त्यांना दूर जाऊ देत नाहीत. त्यामुळेच काचेच्या भांड्यात ते ठेवलं तर त्या भांड्याच्या तोंडाशी वरच्या बाजूला थोडासा फुगवटा येत असतो; पण त्याच वेळी त्याच्यावर हवेचा दाबही पडलेला असतो. हा दाबही पाण्याच्या रेणूंना खालच्या दिशेनं दाबत असतो. जेव्हा आपण पाणी तापवतो.

विजिगीषु वृत्ती तसंच 'मूरच्या नियमा'बरहुकूम चिपची कार्यक्षमता वाढवण्यासाठी केलेले अविरत प्रयत्न, सेमीकंडक्टर उद्योगाच्या वाढीला पुनश्च चालना देण्यासाठी शासकीय स्तरावर घेतले गेलेले धोरणात्मक निर्णय या सर्वांचा एकत्रितपणे परिपाक अमेरिकेच्या चिप क्षेत्रातील पुनरुत्थानात झाला.

# शीतयुद्ध-समाप्तीमागे सेमीकंडक्टर तंत्रज्ञान

याच कालखंडात भूराजकीय परिप्रेक्ष्यातही पुष्कळ घडामोडी होत होत्या. अमेरिका, पश्चिम युरोप, आग्नेय आशियाई देशांच्या समाजवादी किंवा भांडवलशाही पद्धतीनंपण लोकशाही मार्गानं होत असलेल्या आर्थिक भरभराटीमुळे जगभरातली साम्यवादाची लाट ओसरत चालली होती. नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिन भिंत पडल्यानंतर व पुढे डिसेंबर १९९१ मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियाचं विघटन झाल्यानंतर जवळपास चार दशकं अमेरिका विरुद्ध सोव्हिएत रशिया आणि त्यांच्या त्यांच्या सहयोगी देशांमध्ये सुरू असलेल्या शीतयुद्धाची अंतिम घटका जवळ आली होती. शीतयुद्धाच्या समाप्तीला आणि (जरी कोणी अधिकृतरीत्या जाहीर केलं नसलं तरीही) त्यातल्या अमेरिकेच्या विजयाला कारणीभूत असलेल्या विविध घटकांतला अत्यंत महत्त्वाचा घटक हा सेमीकंडक्टर तंत्रज्ञान व निर्मितीत अमेरिकेने रशियावर वादातीतपणे घेतलेल्या आघाडीचा होता. जागतिक



इतिहासात मैलाचा दगड ठरलेल्या आणि भविष्यावर दूरगामी परिणाम करणाऱ्या या घटनेचं विश्लेषण करणं इथं समयोचित ठरावं.शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या कालखंडात (१९४७ – १९६०) युद्धसज्जतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असलेल्या विविध क्षेत्रांत रशियानं आघाडी घेतली होती. अंतराळ तंत्रज्ञान (पहिला उपग्रह आणि पहिला मानव अंतराळात पाठवणं), दूरवर असलेल्या लक्ष्याचा वेध घेण्याची क्षमता असलेली आंतरखंडीय क्षेपणास्त्रं, अणु-विघटनाच्या तंत्रज्ञानावर आधारित अण्वस्त्रं अशा बाबतीत रशियन तंत्रज्ञान अमेरिकेपेक्षा काकणभर सरसच होतं. १९६० नंतर मात्र यात बदल घडायला सुरुवात झाली. निर्वात नलिकांऐवजी सेमीकंडक्टर चिप तंत्रज्ञानाचा लष्करी शस्त्रागारांची अचूकता वाढवण्यासाठी तसंच त्यांच्या वेग व दिशेवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापर वाढू लागला तर दुसऱ्या बाजूला अमेरिकी सेमीकंडक्टर कंपन्यांकडून चिपनिर्मिती घाऊक प्रमाणात होऊ लागली आणि इथंच रशियाची पीछेहाट सुरू झाली. वास्तविक रशियन नेतृत्वाला चिप तंत्रज्ञानाच्या संरक्षणसिद्धतेसाठी असलेल्या महत्त्वाची जाणीव तशी लवकरच झाली. १९६३ मध्येच रशियानं केवळ सेमीकंडक्टर क्षेत्रातल्या संशोधन आणि उत्पादनकार्यासाठी वाहून घेतलेल्या 'झेलेनोग्राड' या शहराची निर्मिती केली. होती की या शहरात उभारलेल्या कारखान्यांतून अत्याधुनिक चिपचं उत्पादन घेता येईल व लष्करी उपकरणांत आधुनिकतेच्या दृष्टीनं अमेरिकेच्या तोडीस तोड कामगिरी करता येईल. पण दुर्दैवानं झेलेनोग्राडला या अपेक्षा पूर्ण करण्यास साफ अपयश आलं. याची प्रामुख्याने दोन कारणं देता येतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**छायाचित्राचा वाद**

## बड्या नेत्यांची राष्ट्रवादी पक्षातून हकालपट्टी


# भुजबळांचा अवमान अंगलट!

## राष्ट्रवादीने १६ जागा लढवल्या

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री, समता परिषदेचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा बिहार निवडणुकीदरम्यान अवमान करणे ओडिशा राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) प्रदेशाध्यक्षांना चांगलेच महागात पडले आहे. राजकुमार यादव यांची पक्षातून सहा वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.**



नुकत्याच पार पडलेल्या बिहार विधानसभेच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १६ जागा लढवल्या होत्या. या निवडणुकीसाठी पक्षाने ओडिशा प्रदेशाध्यक्ष राजकुमार यादव यांची केंद्रीय निरिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. पक्षाध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत प्रचार साहित्यावर मागास समाजाचे नेते म्हणून छगन भुजबळ यांचे छायाचित्र होते. यादव यांनी भुजबळ यांचे छायाचित्र प्रचार साहित्यामध्ये न वापरण्याचे आदेश दिले.सोनपूर मतदारसंघातील उमेदवार धर्मवीर कुमार हे भुजबळ यांचे समर्थक मानले जातात. पिछडा जातीच्या नेते असलेल्या भुजबळ यांना पक्षाकडून दिल्या जात असलेल्या वागणुकीचा धर्मवीर कुमार यांनी निषेध केला. तसेच विधानसभा निवडणुकीतून आपण माघार घेत असून पक्षसुद्धा सोडत असल्याचे जाहीर केले होते. या प्रकाराणाची बिहारमधील प्रसिद्धी माध्यमांमध्ये उलटसुलट चर्चा झाली. त्यानंतर केंद्रीय निरीक्षक पदावरुन यादव यांची तात्काळ हकालपट्टी केली होती व यादव यांना बिहारच्या निवडणुकीमध्ये काम न करण्यास बजावण्यात आले होते.प्रकरण सार्वजनिक झाल्याने पक्षाने राष्ट्रीय सचिव सच्चितानंद सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने पक्षाकडे यासंदर्भातला अहवाल नुकताच दिला होता. यादव यांनी झाल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला नाही. यादव यांनी अनावश्यक वाद निर्माण करुन पक्षामध्ये असंतोष निर्माण केला, असा ठपका समितीने अहवालामध्ये ठेवला आहे. अखेर पक्षाने यादव यांची सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आल्याचे पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रजमोहन श्रीवास्तव यांनी जाहीर केले.छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे बिहारमध्ये चांगले कार्य आहे. बिहारमध्ये इतर मागास वर्गीयांची संख्या मोठी असल्याने भुजबळ यांचा तळागाळात चांगला संपर्क आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते बिहारमध्ये समता परिषद सक्रिय आहे. त्यामुळेच प्रचार साहित्यात भुजबळ यांच्या छायाचित्राचा वापर न करण्याच्या वरिष्ठांच्या आदेशामुळे उमेदवाराने सरळ निवडणुकीतून माघार घेतली होती.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शेतकरी वरिष्ठ जातीचा समजला जातो. ओबीसी नेत्यांना या पक्षात दुय्यम स्थान राहिले आहे. उत्तर भारतातले राजकारण ओबीसी वर्चस्वाचे आहे. त्यामुळे भुजबळ यांना दुय्यम स्थान देण्याचा प्रकार पक्षाच्या चांगलाच अंगलट आला. बिहारमध्ये पक्षाची मोठी बेईज्जत झाली. त्यामुळे पक्षाने राजकुमार यादव यांची हकालपट्टी घेण्याचा निर्णय घेतला.ठा मंत्री, समता परिषदेचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा बिहार निवडणुकीदरम्यान अवमान करणे ओडिशा राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) प्रदेशाध्यक्षांना चांगलेच महागात पडले आहे. राजकुमार यादव यांची पक्षातून सहा वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षाने ओडिशा प्रदेशाध्यक्ष राजकुमार यादव यांची केंद्रीय निरिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. पक्षाध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत प्रचार साहित्यावर मागास समाजाचे नेते म्हणून छगन भुजबळ यांचे छायाचित्र होते.

### केंद्रीय निरिक्षक म्हणून नियुक्ती

यादव यांनी भुजबळ यांचे छायाचित्र प्रचार साहित्यामध्ये न वापरण्याचे आदेश दिले.सोनपूर मतदारसंघातील उमेदवार धर्मवीर कुमार हे भुजबळ यांचे समर्थक मानले जातात. पिछडा जातीच्या नेते असलेल्या भुजबळ यांना पक्षाकडून दिल्या जात असलेल्या वागणुकीचा धर्मवीर कुमार यांनी निषेध केला. तसेच विधानसभा निवडणुकीतून आपण माघार घेत असून पक्षसुद्धा सोडत असल्याचे जाहीर केले

## तटकरे, शिंदे गट वर्चस्वासाठी हातघाईवर

# महायुतीमधील घटक पक्षच एकमेकांविरोधात

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते व रोजगार हमी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. जिल्ह्यात वर्चस्व सिद्ध करण्यावरून दोन्ही पक्ष हातघाईवर आले आहेत.**



जिल्ह्यात दहा नगरपालिकांसाठी निवडणूक होत आहे. यात अलिबाग, मुरुड-जंजिरा, रोहा, श्रीवर्धन, महाड, पेण, उरण, खोपोली, कर्जत आणि माथेरान नगरपालिकांचा समावेश आहे. दहा नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदासाठी ३४, तर नगरसेवकपदासाठी ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. महायुतीमधील घटक पक्षच एकमेकांविरोधात निवडणूक रिंगणात उतरले आहेत

.दहापैकी अलिबागचा अपवाद सोडला तर एकाही नगरपालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती होऊ शकलेली नाही. उलट बहुतेक ठिकाणी दोन्ही पक्ष सोयीस्कर युत्या करून एकमेकांविरोधात निवडणुकीत उतरले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिवसेना शिंदे गटाची चौफेर कोंडी व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे संतापलेले शिवसेनेचे तिन्ही आमदार खासदार सुनील तटकरेंविरोधात कमालीचे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.निवडणुकीच्या प्रचारातून स्थानिक मुद्दे दूर फेकले गेले आहेत. एकमेकांची उणीदुणी काढण्यावर दोन्ही पक्षांकडून भर दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

तर, दुसरीकडे एकमेकांचे पक्ष फोडण्यावर दोन्ही पक्षांनी भर दिल्याने, दोन्ही पक्षांमधील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. अशातच भरत गोगावले यांनी आदिती तटकरे यांच्या मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या म्हसळा नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष आणि नगरसेवक फोडल्याने राजकीय वादाला तोंड फुटले आहे. त्यामुळे निवडणूक नगरपालिकांची असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेना शिंदे गटाचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्यातच राजकीय लढाई रंगली आहे. रायगड हा एकेकाळी शेकापचा बालेकिल्ला मानला जायचा. पण, सध्या शेकापसाठी अस्तित्वाची लढाई आहे.

### आघाडीचे भवितव्य अडचणीत

शेकाप, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्या जनाधाराला ओहोटी लागली आहे. महाविकास आघाडीचे भवितव्य अडचणीत आल्याचे दिसत आहे. अशावेळी जिल्ह्याच्या राजकारणावर घट्ट पकड प्रस्थापित करण्याची संधी महायुतीला होती.

राणा अय्युब यांना धमकी! जगभरच्या माध्यम संस्थानी पोलीसांना लिहिले पत्र

# पत्रकार राणा अय्युब यांना धमकी!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'वॉशिंग्टन पोस्ट'च्या स्तंभलेखिका व गाजलेल्या महिला शोध पत्रकार राणा अय्युब यांना व त्यांच्या वडिलांना जीवे मारण्याच्या आलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर संरक्षण द्यावे, अशी मागणी जगभरच्या नामवंत माध्यम संघटनांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्याकडे केली आहे.**

## कोण आहेत राणा अय्युब ?



राणा अय्युब यांना दूरध्वनीवर २ नोव्हेंबर रोजी धमकी देण्यात आली. १९८४ ची शीखविरोधी दंगल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येप्रकरणी लेख प्रसिद्ध करा, अन्यथा पित्यांसह तुम्हाला ठार मारण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली आहे. राणा यांचा दूरध्वनी क्रमांक व त्यांच्या घराचा पत्ता समाज माध्यमावर सार्वजनिक करण्यात आला आहे. त्यामुळे राणा यांना अनावश्यक शेकडो दूरध्वनी कॉल्स आणि संदेशांचा सामना करावा लागला होता.राणा यांनी याप्रकरणी कोपर खैरणे पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली आहे. पोलिसांनी सदर गुन्हा अदखलपात्र नोंदवला आहे. सदर गुन्ह्याचे दखलपात्र मध्ये रुपांतरीत करावे, राणा व त्यांच्या पित्याला पोलीस व डिजीटल संरक्षण द्यावे. या धमक्यांमागील व्यक्ती ओळखण्यासाठी सायबर गुन्हे आणि दूरसंचार अधिकाऱ्यांशी मदत घ्यावी, पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि भारताच्या प्रेस स्वातंत्र्याच्या घटनात्मक हमींचे समर्थन करण्यासाठी कायदा अंमलबजावणीच्या वचनबद्धतेची सार्वजनिकरित्या पुष्टी करा, आदी मागण्या माध्यम संघटनांनी नवी मुंबई पोलिसांकडे केल्या आहेत.नवी मुंबई पोलिसांना पत्र लिहिण्यात आले आहे, त्यावर कमिटी टू प्रोटेक्ट जर्नलिस्ट्स, फ्री प्रेस अनलिमिटेड, इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिट्यूट, इंटरनॅशनल वुमेन्स मीडिया फाउंडेशन, रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स, पेन अमेरिका, पेन कॅनडा, पेन इंटरनॅशनल, महिला प्रेस फ्रीडम अँड द कोलिशन फॉर वुमन इन जर्नलिझम या माध्यम संघटना व संस्थांची नावे आहेत. सुश्री राणा अय्युब भारतातील शोध पत्रकारांपैकी एक आहेत, ज्या सांप्रदायिक हिंसाचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघना बद्दल वार्तांकन करण्यासाठी ओळखल्या जातात. अमीत शाह यांना २०१० मध्ये अनेक महिन्यांसाठी तुरुंगात पाठवण्यात अय्युब यांच्या वार्तांकनाची भूमिका कळीची होती. गेल्या अनेक वर्षांपासून, त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या आणि कायदेशीर छळाला सामोरे जावे लागले आहे. राणा अय्युब यांनी 'तहलका'साठी गुजरात दंगलीसदंर्भात शोध वृत्तांत लिहिले आहेत. त्या अनुभवांचे त्यांचे 'गुजरात फाईल्स' हे पुस्तक प्रकाशित आहे. 'टाइम मासिका'ने दहा जागतिक पत्रकारांमध्ये राणा यांच्या नावाचा समावेश केला आहे.'वॉशिंग्टन पोस्ट'च्या स्तंभलेखिका व गाजलेल्या महिला शोध पत्रकार राणा अय्युब यांना व त्यांच्या वडिलांना जीवे मारण्याच्या आलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर संरक्षण द्यावे, अशी मागणी जगभरच्या नामवंत माध्यम संघटनांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्याकडे केली आहे. राणा अय्युब यांना दूरध्वनीवर २ नोव्हेंबर रोजी धमकी देण्यात आली. १९८४ ची शीखविरोधी दंगल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येप्रकरणी लेख प्रसिद्ध करा, अन्यथा पित्यांसह तुम्हाला ठार मारण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली आहे. राणा यांचा दूरध्वनी क्रमांक व त्यांच्या घराचा पत्ता समाज माध्यमावर सार्वजनिक करण्यात आला आहे. त्यामुळे राणा यांना अनावश्यक शेकडो दूरध्वनी कॉल्स आणि संदेशांचा सामना करावा लागला होता.राणा यांनी याप्रकरणी कोपर खैरणे पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली आहे. पोलिसांनी सदर गुन्हा अदखलपात्र नोंदवला आहे. सदर गुन्ह्याचे दखलपात्र मध्ये रुपांतरीत करावे.

### घटनात्मक हमींचे समर्थन

राणा व त्यांच्या पित्याला पोलीस व डिजीटल संरक्षण द्यावे. या धमक्यांमागील व्यक्ती ओळखण्यासाठी सायबर गुन्हे आणि दूरसंचार अधिकाऱ्यांशी मदत घ्यावी, पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि भारताच्या प्रेस स्वातंत्र्याच्या घटनात्मक हमींचे समर्थन करण्यासाठी कायदा अंमलबजावणीच्या वचनबद्धतेची सार्वजनिकरित्या पुष्टी करा, आदी मागण्या माध्यम संघटनांनी नवी मुंबई पोलिसांकडे केल्या आहेत.

# कर्नाटकात 'एकनाथ शिंदें'चा प्रयोग?

## काँग्रेसकडून खरगेंना मुख्यमंत्रीपद सोपविण्याच्या हालचाली

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार (डीके) यांनी पुरेसे आमदार जमवले तर भारतीय जनता पक्ष त्यांना कर्नाटकचे 'एकनाथ शिंदे' करू शकतात. तसे झाले तर हातातून मोठे राज्य निसटेल, अशी भीती काँग्रेस 'हायकमांड'ला वाटू लागली आहे. त्यामुळेच काँग्रेसमधील फूट आणि राज्यातील सरकार वाचवण्यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवले जाऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे.**



कर्नाटकातील मुख्यमंत्रीपदाचा वाद विकोपाला गेला असून, राहुल गांधींनी सिद्धरामय्या व डी. के. शिवकुमार यांना चर्चेसाठी दिल्लीला बोलावले आहे. या बैठकीमध्ये तोडगा निघाला नाही, तर खरगेंच्या नावाचा गांभीर्याने विचार केला जाऊ शकतो. कर्नाटकमधील संघर्षावर हायकमांड निर्णय घेईल, असे सांगून खरगेंनी ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असल्याचेही सूचित केले आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बनण्याची खरगेंची संधी तीन वेळा हुकली होती, आता ही कदाचित शेवटची संधी असल्याचे खरगेंना वाटत आहे. शिवाय, बिहारमधील नामुष्कीजनक पराभवानंतर काँग्रेसने आत्मविश्वास गमावलेला आहे. पक्षाचे सर्व निर्णय राहुल गांधी आणि त्यांचे निकटवर्तीय घेत आहेत.

खरगेंकडे दिल्लीत पक्षाची सूत्रेही राहिलेली नाहीत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री होणे अधिक योग्य आहे, असा विचार खरगेंकडून होत असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांचे म्हणणे आहे.मी नसेन तर खरगेंना मुख्यमंत्री करा,' असे अडीच वर्षांपूर्वी डीकेंनी स्वतःच राहुल गांधींना सांगितले होते. त्यांच्या विधानाची आठवण दिल्लीतील बैठकीत डीकेंना करून दिली जाऊ शकते. सहमतीचा चेहरा म्हणून खरगेंना सोनिया गांधींनी पाठिंबा,असला तरी राहुल गांधींची पसंती अजूनही सिद्धरामय्याच असल्याचे सांगितले जाते. सोनियांनी या वादात हस्तक्षेप न करण्याचे ठरवले तर मात्र हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. काँग्रेस नेते राहुल गांधींनी सिद्धरामय्या यांच्या पारड्यात वजन टाकले तर मात्र डीकेंना राजकीय पर्याय शोधावा लागणार आहे.काँग्रेसमधील समर्थक आमदारांच्या मोठ्या गटासह बाहेर पडून भाजपच्या पाठिंब्यावर सत्ता स्थापन करण्याचा डीकेंचा डाव असल्याचे सांगितले जाते.

### ...तर डीकेंना अन्य पर्याय

अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्रीपद देण्याचे हायकमांडचे आश्वासन पाळले गेले नाही तर डीके नोव्हेंबरच्या अखेरीला काँग्रसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतील, असे त्यांचे समर्थक खासगीमध्ये सांगत होते. – सध्या डीकेंच्या ताकदीचा भाजप अंदाज घेत आहे. ते कर्नाटकचे 'एकनाथ शिंदे' ठरले तर त्यांना पाठिंबा देऊन डीके-भाजप सरकार कर्नाटकमध्ये आणण्याचा प्रयत्न होईल.

# 20 वर्षांपासून वडिलांना भेटलेली नाही जिया

बिग बॉस OTT 2 चा ग्रँड फिनाले 14 ऑगस्ट रोजी होणार आहे. ग्रँड फिनालेच्या अवघ्या 4 दिवसांपूर्वी जिया शंकर शोमधून बाहेर पडली. जियाच्या एलिमिनेशनसोबतच, बिग बॉस ओटीटी 2 ला टॉप 5 फायनलिस्ट मिळाले आहेत. शोमधून बाहेर पडल्यानंतर मीडियाशी बोलताना जियाने तिच्या वडिलांबद्दल माहिती दिली. तिने सांगितले की, तिचे वडील तिला 20 वर्षांपासून तिला भेटले नाहीत, तिला त्यांची आठवण येते. याआधीही जियाने बिग बॉसच्या घरात तिच्या वडिलांचा अनेकदा उल्लेख केला आहे. एलिमिनेशनच्या आधीही तिने स्पर्धक एल्विश यादवला सांगितले की. तिचे वडील खूप दिवसांपासून भेटलेले नाहीत. दुसऱ्या लग्नापासून त्यांना एक मुलगी देखील आहे आणि ते त्यांच्या कुटुंबात आनंदी आहेत. जिया अशा क्षणांबद्दल उघडपणे बोलली जेव्हा तिला तिच्या वडिलांची सर्वात जास्त आठवण येते. ती म्हणाली- जेव्हा मी इतर कुटुंबांना एकत्र पाहते तेव्हा मला त्यांची आठवण येते. जेव्हा जेव्हा एखादी वृद्ध व्यक्ती मला काही बोलते आणि नंतर मी त्यांना काहीही बोलू शकत नाही तेव्हा अशा क्षणांमध्ये मला त्यांची आठवण येते. 'जेव्हा मी लहान होतो आणि कोणी मला काही बोलायचे, तेव्हा मी माझ्या वडिलांकडे धावत असे. मी त्याच्याकडे जाऊन तक्रार करायचे, मग ते नेहमी माझी बाजू घेत असे. त्यांनी माझ्यावर खूप प्रेम केले, माझे संरक्षण केले. आता जेव्हा जेव्हा मला असुरक्षित किंवा अशक्त वाटते तेव्हा मला त्यांची खूप आठवण येते. एलिमिनेशनपूर्वीच जियाने शोचा स्पर्धक एल्विश यादवशी तिच्या वडिलांबद्दल बोलली होती. एल्विश आणि जिया दोघेही बागेच्या परिसरात फिरत होते. त्यावेळी जेव्हा एल्विशने जियाला विचारले की तिला वडिलांशी बोलणे आवडत नाही का? आम्ही एकमेकांशी बोलत नाही.



# इशिताने मुलाचे नाव वायु ठेवले

दृश्यम फेम अभिनेत्री इशिता दत्ता आणि वत्सल सेठ 19 जुलै रोजी आई-वडील झाले. इशिताने एका मुलाला जन्म दिला आहे. नुकतेच दोघांनीही आपल्या मुलाचे नाव ठेवले आहे. या सोहळ्याचा व्हिडिओ शेअर करत त्यांनी आपल्या मुलाचे नाव उघड केले आहे. वायुसेठ असे मुलाचे नाव आहे. इशिताने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये तो आपल्या मुलाचा कार्यक्रम पारंपारिक गुजराती विधी करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना जोडप्याने त्यांच्या इंस्टाग्रामवर लिहिले, 'आमच्या लहान मुलाचा नामकरण समारंभ. वायु सेठ, सर्वांच्या प्रेम आणि आशीर्वादाबद्दल धन्यवाद. इशिता दत्ताने 2017 मध्ये बॉलिवूड अभिनेता वत्सल सेठसोबत मोठ्या थाटात लग्न केले. आता लग्नाला 5 वर्षे पूर्ण झाली असून हे जोडपे आई-वडील झाले आहेत. इशिता ही बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री तनुश्री दत्ताची बहीण



# करीना-सैफमुळे सारा होती खूश



सारा अली खान आज 28 वर्षांची झाली आहे. ती 5 वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सक्रिय असून एकूण 7 चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे. नवाब कुटुंबात जन्मलेली सारा आई-वडिलांना पाहून अभिनय क्षेत्रात आली. सुरुवातीच्या काळात कधी लठ्ठपणामुळे तर कधी अभिनयामुळे तिला ट्रोल व्हावे लागले. मात्र, कुटुंब आणि आत्मविश्वासाच्या बळावर ती पुढे जात राहिली. त्याच वेळी, ती नेहमीच करीना कपूरची मोठी चाहती होती. करिनाने आपल्या कुटुंबाचा भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. सारा अली खानचा जन्म 12 ऑगस्ट 1995 रोजी मुंबईत पतौडी कुटुंबात झाला. वडील सैफ अली खान आणि आई अमृता सिंग हे दोघेही चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चेहरे होते. साराही तिच्या आई-वडिलांना पाहून अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहायची. ती 4 वर्षांची झाल्यावर तिच्या आईने एका शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रवेशासाठी कॉल केला. आईने मुख्याध्यापकासमोर साराचे खूप कौतुक केले आणि सांगितले की ती अभ्यासात खूप चांगली आहे. यावर मुख्याध्यापकांनी साराशी बोलायचे असल्याचे सांगितले. सैफ अली खान आणि अमृता सिंग यांचे नाते केवळ 13 वर्षे टिकले. यानंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्याच वेळी, सारा 17 वर्षांची असताना सैफ अली खानने करीना कपूरसोबत दुसरे लग्न केले. साराला जेव्हा तिच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळाली तेव्हा तिला खूप आनंद झाला. वास्तविक, जेव्हापासून साराने कभी खुशी कभी चित्रपट पाहिला तेव्हापासून ती करीना कपूरच्या व्यक्तिरेखेने खूप प्रभावित झाली होती. करीनाने कोणत्याही प्रकारे तिच्या कुटुंबाचा एक भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. वडिलांच्या आयुष्यात दुसरं कुणीतरी प्रवेश करणार असल्याचं लग्नाच्या बातमीने तिला अजिबात वाईट वाटलं नाही. ही बातमी ऐकून ती आईकडे गेली आणि लग्नात काय घालू हे विचारू लागली. यावर अमृताने डिझायनरला बोलावून तिच्यासाठी सर्वात सुंदर ड्रेस डिझाईन करण्यास सांगितले. सैफ आणि करिनाच्या लग्नात तिने अनारकली सूट परिधान केला.

# जितेंद्र यांनी खरेदी केली लक्झरी कार

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी नुकतीच एक नवीन रेंज रोव्हर एसयूव्ही कार खरेदी केली आहे. बातमीनुसार, कारची किंमत करोडोंमध्ये आहे. दिग्गज अभिनेत्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये ते त्याच कारमधून शनी मंदिरात दर्शनासाठी आले होते. लोकप्रिय व्हिडिओमध्ये, जितेंद्र यांची कार शनी मंदिराबाहेर उभी होती, जिथे दर्शन घेण्यासाठी आले होते. येथे काही काळ थांबून त्यांनी दर्शन घेतले आणि नंतर आपल्या गाडीतून निघून गेले. आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहून मंदिरात आलेल्या लोकांनी जितेंद्रसोबत सेल्फी काढण्याची विनंती केली. त्यांना पाहताच मंदिराभोवती गर्दी झाली. अभिनेत्याने तेथे आलेल्या चाहत्यांसह छायाचित्रे क्लिक केली आणि त्यांचे आभार मानले. कार ब्लॉग इंडियाच्या रिपोर्टनुसार, जितेंद्रने रेंज रोव्हरची एसयूव्ही कार खरेदी केली आहे, ज्याची नवीनतम किंमत सुमारे 2.38 कोटी रुपये आहे. मात्र, कारची खरी किंमत काय आहे, याबाबत कोणतीही ठोस माहिती नाही.

# अमिताभ बच्चन यांच्याकडून सोशल मीडियावर झाली चूक

बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन त्यांच्या कामासह सोशल मीडियावरील पोस्टमुळे कायम चर्चेत असतात. इतर कलाकारांप्रमाणे अमिताभ बच्चनही सोशल मीडियावर सक्रिय असतात. कधी कोणत्या चित्रपटाचं, कलाकाराचं कौतुक करतात तर कधी चालू घडामोडींविषयी देखील भाष्य करतात. अलीकडेच बिग बी यांनी एक पोस्ट शेअर केली होती. पण या पोस्टमध्ये त्यांच्याकडून एक चूक झाली होती. या चुकीमुळे अमिताभ बच्चन यांनी चाहत्यांनी माफी मागितली आहे.अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांनी इन्स्टाग्रामवर स्वतःच्या चित्रपटातील एक व्हिडीओ शेअर केला होता. या व्हिडीओत ते धावताना दिसत होते. तसंच चित्रपटातील त्या व्हिडीओनंतर सध्याचा व्हिडीओ होता. ज्यामध्ये अमिताभ बच्चन गार्डनमध्ये धावताना पाहायला मिळाले. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी पहिला व्हिडीओ 'अग्निपथ' चित्रपटातील असल्याचं म्हटलं होतं.व्हिडीओ शेअर करत त्यांनी लिहिलं होतं, "'अग्निपथ' पासून ते आतापर्यंत धावतचं आहे. अजूनही 'अग्निपथ' (१९९०) पासून ते आतापर्यंत कामासाठी धावत आहे." पण शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये बिग बींचा जो धावतानाचा सीन होता, तो 'अग्निपथ' चित्रपटातील नाही तर 'अकेला' चित्रपटातील होता. ही चूक जेव्हा बिग बींच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी चाहत्यांची माफी मागितली.अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांनी इन्स्टाग्राम स्टोरीवरून चाहत्यांची जाहीर माफी मागितली. ते म्हणाले, "माफ करा. 'अग्निपथ' संबंधित धावतानाची जी पोस्ट मी गेली होती, ती चुकीची होती. तो सीन 'अकेला' चित्रपटातील आहे. शुभचिंतकांचे आभार."दरम्यान, अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, त्यांचा २७ जूनला 'कल्कि २८९८ एडी' (KALKI 2898 AD) चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात त्यांनी अश्वत्थामाची भूमिका साकारली होती. अमिताभ बच्चन यांनी साकारलेली ही भूमिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली. आता बिग बी 'कल्कि २८९८ एडी' चित्रपटाच्या पुढच्या भागात देखील झळकणार आहेत.

गंभीरची पाठराखण

## गावस्कर, अश्विन यांच्याकडून गंभीरची पाठराखण

# एकट्या प्रशिक्षकाला दोष देणे अयोग्य!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वर्षभरात दुसऱ्यांदा मायदेशातील कसोटी मालिका गमावल्याने भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर टीकेची झोड उठली आहे. कसोटी संघासाठी नवा प्रशिक्षक नेमण्याची वेळ आल्याचे मत काही जाणकारांनी व्यक्त केले आहे. मात्र, भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर आणि माजी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यांनी गंभीरची पाठराखण केली असून एकट्या प्रशिक्षकाला दोष देणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

### कसोटी संघासाठी नवा प्रशिक्षक




गंभीरच्या १६ महिन्यांच्या कार्यकाळात भारताने १९ पैकी १० कसोटी सामने गमावले असून केवळ सात सामने जिंकले आहेत. गंभीरची विजयाची टक्केवारी ३६.८२ अशी आहे. भारतीय संघाच्या प्रशिक्षकाची ही आजवरची दुसरी सर्वांत सुमार कामगिरी ठरते.“गंभीर प्रशिक्षक आहे. संघाला तयार करणे हे प्रशिक्षकाचे काम असते. तो खेळाडूंना केवळ मार्गदर्शन करू शकतो, सल्ले देऊ शकतो. प्रत्यक्षात मैदानावर जाऊन योजनेची अंमलबजावणी करणे, सर्वोत्तम कामगिरी करणे हे काम खेळाडूंचे असते. त्यामुळे अपयशासाठी केवळ प्रशिक्षकाला कसे जबाबदार धरले जाऊ शकते?” असा प्रश्न गावस्कर यांनी उपस्थित केला.“गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने चॅम्पियन्स करंडक आणि आशिया चषक जिंकला, त्यावेळी त्याचा करार वाढवला पाहिजे, त्याला आजीवन करार दिला पाहिजे असे कोणी म्हटले का? मग आता संघ अपयशी ठरत असताना त्याची हकालपट्टी करण्याची मागणी का केली जाते? संघ चांगली कामगिरी करत नसेल, तेव्हाच प्रशिक्षकाबाबत चर्चा करणे, त्याला जबाबदार धरणे योग्य नाही,” असे रोखठोक मत गावस्कर यांनी व्यक्त केले.त्याच वेळी गंभीरचा माजी सहकारी आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली खेळलेल्या अश्विननेही त्याचे समर्थन केले. “आपण अशा प्रकारच्या चर्चा का करत आहोत? खेळ आहे, त्यात हार-जीत होतच राहणार. एखाद्या संघाला सांभाळणे सोपी गोष्ट नाही. मालिका गमावल्याचे गंभीरलाही खूप दु:ख झाले असेल. प्रशिक्षकाची हकालपट्टी करा, असे म्हणणे सोपे आहे. मात्र, मला हे कधीही पटलेले नाही. गंभीर माझा नातेवाईक नाही. मी त्याच्या १० चुका दाखवू शकतो. मात्र, चुका प्रत्येकाकडूनच होतात हे विसरता कामा नये. तुम्ही एकट्या प्रशिक्षकाला जबाबदार धरू शकत नाही. प्रशिक्षक स्वत: बॅट घेऊन खेळायला जाऊ शकत नाही. खेळाडू आपले काम चोख करतील, तेव्हाच प्रशिक्षक यशस्वी ठरू शकतो,” असे अश्विन म्हणाला.

### आजीवन करार दिला पाहिजे

जाऊ शकते?” असा प्रश्न गावस्कर यांनी उपस्थित केला.“गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने चॅम्पियन्स करंडक आणि आशिया चषक जिंकला, त्यावेळी त्याचा करार वाढवला पाहिजे, त्याला आजीवन करार दिला पाहिजे असे कोणी म्हटले का? मग आता संघ अपयशी ठरत असताना त्याची हकालपट्टी करण्याची मागणी का केली जाते? संघ चांगली कामगिरी करत नसेल, तेव्हाच प्रशिक्षकाबाबत चर्चा करणे, त्याला जबाबदार धरणे योग्य नाही,” असे रोखठोक मत गावस्कर यांनी व्यक्त केले.

तुम्ही अपयशासाठी एकट्या प्रशिक्षकाला जबाबदार धरू शकत नाही. प्रशिक्षक स्वत: बॅट घेऊन खेळायला जाऊ शकत नाही. ते काम खेळाडूंचे आहे. खेळाडू आपले काम चोख करतील, तेव्हाच प्रशिक्षक यशस्वी ठरू शकतो. – रविचंद्रन अश्विन, माजी फिरकीपटू भारतीय संघाने चॅम्पियन्स करंडक आणि आशिया चषक जिंकला, तेव्हा गंभीरला फारसे श्रेय मिळाले नाही. मग आता भारतीय संघ अपयशी ठरत असताना त्याला एकट्याला का जबाबदार धरायचे? वर्षभरात दुसऱ्यांदा मायदेशातील कसोटी मालिका गमावल्याने भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर टीकेची झोड उठली आहे. कसोटी संघासाठी नवा प्रशिक्षक नेमण्याची वेळ आल्याचे मत काही जाणकारांनी व्यक्त केले आहे. मात्र, भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर आणि माजी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यांनी गंभीरची पाठराखण केली असून एकट्या प्रशिक्षकाला दोष देणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.गंभीरच्या १६ महिन्यांच्या कार्यकाळात भारताने १९ पैकी १० कसोटी सामने गमावले असून केवळ सात सामने जिंकले आहेत. गंभीरची विजयाची टक्केवारी ३६.८२ अशी आहे.दुसरी सर्वांत सुमार कामगिरी ठरते.“गंभीर प्रशिक्षक आहे. संघाला तयार करणे हे प्रशिक्षकाचे काम असते. तो खेळाडूंना केवळ मार्गदर्शन करू शकतो, सल्ले देऊ शकतो. प्रत्यक्षात मैदानावर जाऊन योजनेची अंमलबजावणी करणे, सर्वोत्तम कामगिरी करणे हे काम खेळाडूंचे असते.


# घटस्फोटित अभिनेत्रीने क्रिकेटपटूशी केलं लग्न

## पहिल्या पतीपासून आहे 10 वर्षांचा मुलगा, विवाहाचे फोटो आले समोर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एका घटस्फोटित अभिनेत्रीने दिग्गज क्रिकेटपटूच्या मुलाशी दुसरं लग्न केलं आहे. दोघांच्याही लग्नाचे फोटो सोशल मीडियावर चर्चेत आहेत. १० वर्षांच्या मुलाची आई असलेली ही अभिनेत्री म्हणजे ‘बिग बॉस तमिळ 4’ फेम संयुक्ता शान होय. ३९ वर्षांची संयुक्ता सध्या तिच्या दुसऱ्या लग्नामुळे चर्चेत आली आहे. संयुक्ताने सीएसकेच्या माजी खेळाडूशी दुसरं लग्न केलं आहे. संयुक्ताच्या पतीचं नाव**



अनिरुद्ध श्रीकांत आहे. ३७ वर्षांचा अनिरुद्ध माजी क्रिकेटपटू आहे. सध्या तो क्रिकेट समालोचन करतो. संयुक्ताने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर लग्नाचे फोटो पोस्ट केले आहेत.संयुक्ताने आज २७ नोव्हेंबरला अनिरुद्ध श्रीकांतशी दुसरं लग्न केलं. तिने लग्नाची तारीख कॅप्शनमध्ये शेअर करून काही फोटो पोस्ट केले. तिच्या या फोटोंवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.

संयुक्ताला तिच्या वैवाहिक आयुष्यासाठी सर्वजण शुभेच्छा देत आहेत.‘बिग बॉस तमिळ’च्या सीझन ४ फेम संयुक्ता ही आधी मॉडेलिंग करत होती.

तिने २००७ मध्ये ‘मिस चेन्नई’चा किताब जिंकला होता. ‘बिग बॉस’मुळे प्रसिद्धी मिळाली आणि तिला कामही मिळालं. तिने विजयच्या ‘वारिसु’ या चित्रपटात काम केलं. ‘कॉफी विथ लव्ह’, ‘तुघलक दरबार’ आणि ‘माय डिअर भूतम’ हे संयुक्ताचे गाजलेले सिनेमे होय.संयुक्ता शान हिचं पहिलं लग्न कार्तिक नावाच्या व्यक्तीशी झालं होतं आणि त्यांना एक मुलगाही आहे. काही दिवसांसाठी कार्तिक दुबईला गेला आणि नंतर तो परत आला नाही. त्यामुळे दोघांनी मतभेदांमुळे घटस्फोट घेतला. संयुक्ताचा मुलगा १० वर्षांचा आहे.

### कोण आहे संयुक्ता शान?

अनिरुद्ध श्रीकांत हा माजी क्रिकेटपटू कृष्णमाचारी श्रीकांत यांचा मुलगा आहे. अनिरुद्ध इंडियन प्रिमियर लीगमध्ये चेन्नई सुपर किंग्ससाठी काही सीझन खेळला होता. सध्या तो क्रिकेट समालोचक आहेत. अनिरुद्धने २०१२ मध्ये आरती वेंकटेशशी लग्न केलं होतं, पण काही वर्षांपूर्वी त्यांचा घटस्फोट झाला. आता अनिरुद्ध व संयुक्ता विवाहबंधनात अडकले आहेत. दोघांचंही हे दुसरं लग्न आहे.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 28 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पीसीसीओइआरच्या खेळाडूंची

# बॉल बॅडमिंटन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी!

### शिक्षण विश्व : लेखा कोतवाल व श्रावणी जगताप यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च येथील मुलींच्या संघाने इंटर कॉलेज बॉल बॅडमिंटन (मुली) स्पर्धा या विभागीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च यांच्या वतीने रावेत येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन (मुली) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत अंतिम सामन्यात हडपसर येथील एस. एम. जोशी महाविद्यालयाने पीसीसीओईआर च्या संघास पहिल्या फेरीत ३५ – २३ आणि दुसऱ्या फेरीत ३५ – २० असा सरळ सेट मध्ये पराभव करून प्रथम क्रमांक मिळविला. सेमी फायनल सामन्यात पीसीसीओईआर संघाने हडपसर येथील ए. एम. महाविद्यालय संघावर प्रथम फेरीत ३५ – २४, द्वितीय फेरीत १६ – ३५, तर तृतीय फेरीत ३५ – २५ गुणांनी विजय मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला.

पीसीसीओईआर संघातील लेखा कोतवाल आणि श्रावणी जगताप यांची पुणे विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी पुणे जिल्हा संघात निवड झाली. द्वितीय क्रमांक प्राप्त पीसीसीओईआर संघात कल्याणी कोळपे, मन्हा मुलानी, सृष्टी पाटील, भार्गवी काळभोर, वैष्णवी जगताप, मनस्वी रणखांब, वैष्णवी कल्याणकर, ज्ञानेश्वरी वर्पे या विद्यार्थिनींचाही समावेश होता.

स्पर्धेचे आयोजनात शारीरिक शिक्षण संचालक मिलिंद थोरात, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. अमेय काळे, प्रा. ऋषिकेश कुंभार, प्रा. अमोल आहेर, प्रा. राजेंद्र लांडगे यांनी सहभाग घेतला.

पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, आर. अँड डी. विभाग प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे, पीसीसीओई क्रीडा संचालक प्रा. संतोष पाचारणे यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजयी संघाचे अभिनंदन करून लेखा कोतवाल व श्रावणी जगताप यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## “संविधान भारतीय लोकशाहीचा आत्मा”: डॉ. नारायण टाक

### जेजुरीत संविधान दिन उत्साहात : भीमरत्न पुरस्कारांनी मान्यवरांचा गौरव

। जेजुरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वातंत्र्यानंतर भारताने संसदीय लोकशाहीची वाट निवडली आणि कायद्याच्या राज्याची पायाभरणी केली. या लोकशाही व्यवस्थेला अधोरेखित करणारे भारतीय संविधान हे राष्ट्राचे मार्गदर्शक तत्व असून तेच भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे, असे मत संविधान अभ्यासक प्रा. डॉ. नारायण टाक यांनी व्यक्त केले. आर.पी.आय. विचार मंचतर्फे जेजुरी येथे संविधान दिनाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.**




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. नारायण टाक, दैनिक भास्कर पुणे संपादक मुनीश शर्मा, राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नंदकिशोर सागर, ससून रुग्णालयातील डी.एन. डॉ. काशीद, लेखक–पत्रकार दिनकर कद्रू, तालुका शिक्षक संघ अध्यक्ष दत्तात्रय रोकडे, प्राचार्य कुंडलिक मेमाणे, वसंतराव ताकवाले, रामभाऊ पेठकर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांची उजळणी करण्यात आली. “संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च अधिष्ठान आहे,” असे प्रतिपादन डॉ. टाक यांनी केले.

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना भीमरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रातील संविधान जागृती व नागरिकांच्या कर्तव्याबाबत प्राचार्य डॉ. नंदकिशोर सागर यांनी प्रभावी विचार मांडले.

आर.पी.आय. पुणे जिल्ह्याचे माजी अध्यक्ष पंढरीनाथ जाधव हे मागील सोळा वर्षांपासून संविधान दिनाचे आयोजन सातत्याने करीत असून त्यांचा विशेष सन्मानही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय रोकडे यांनी केले.

अभाविप पिंपरी चिंचवड आणि बापू एमसीसी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त

# सामूहिक प्रास्ताविकेचे वाचन व शहिदांना श्रद्धांजली अर्पण

## शिक्षण विश्व: भोसरीतील सखुबाई गबाजी गवळी उद्यानात विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: संविधान दिनानिमित्त अभाविप पिंपरी चिंचवड आणि बापू एमसीसी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सखुबाई गबाजी गवळी उद्यान, भोसरी येथे भारतीय संविधानातील प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या उपक्रमात नागरिक, विद्यार्थी आणि युवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत**



**संविधान मूल्यांप्रती आदर व राष्ट्रीय बांधिलकी व्यक्त केली.**

डायरेक्टर पृथ्वीराज शिंदे तसेच स्वप्निल होरे, रसिका पाटील आणि दिपांशी साटणकर उपस्थित होते. विद्यार्थी अश्विनी शिरसाट आणि ऋतुजा कवठाळे यांच्या मागे सर्वांनी संविधान प्रास्ताविका वाचन केले, ज्यामुळे देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रीय भावनेचा संदेश या वेळी 26 नोव्हेंबर 2008 मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवान आणि निष्पाप नागरिकांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संविधाननिष्ठा, सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रीय भावनेचा संदेश देत हा उपक्रम यशस्वीरीत्या

# श्रीकृष्ण कथासोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

## हजारो भाविकांची वाकड–ताथवडे- पुनावळे परिसरातून गर्दी



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड येथे राम हनुमंत वाकडकर आयोजित तीन दिवसीय श्रीकृष्णलीला (मायरा कथा) सोहळ्याचा काल भक्तिमय वातावरणात यशस्वी समारोप झाला. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या भव्य सोहळ्याला वाकड–ताथवडे- पुनावळे परिसरातून हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिसरात अखंड नामस्मरण, अध्यात्मिक वातावरण आणि भक्तिरसाने न्हाऊन निघालेली उपस्थिती पाहता संपूर्ण वातावरण पवित्रतेने दुमदुमले होते.**

पहिल्या दिवशी झालेल्या उद्घाटनापासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. जया किशोरी यांच्या अमृतमय आणि हृदयस्पर्शी निरूपणाने तीनही दिवस भाविक मंत्रमुग्ध झाले. सोहळ्यादरम्यान महिलावर्ग, तरुण, तसेच कुटुंबांसह वयोवृद्धांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. परिसरातील विविध सामाजिक मंडळी आणि मान्यवरांनीही उपस्थित राहून सोहळ्यास अधिक रंगत आणली.

मुख्य आयोजक राम हनुमंत वाकडकर यांनी सांगितले की, "वाकड–ताथवडे- पुनावळे परिसरात आजवर केलेल्या सामाजिक आणि सेवाभावी कामाची पावती नागरिकांनी दिलेल्या या प्रचंड प्रतिसादातून दिसून आली. तीन दिवसांच्या या सोहळ्यात भाविकांनी दाखवलेला सहभाग अविस्मरणीय आहे."

तीन दिवस चाललेल्या या कथा सोहळ्याने वाकड–ताथवडे- पुनावळे परिसराच्या अध्यात्मिक संस्कृतीत एक विशेष अध्याय जोडला असून, भाविकांच्या मोठ्या गर्दीमुळे हा कार्यक्रम वर्षानुवर्षे स्मरणात राहील, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी, खासदार- श्रीरंग (आप्पा) बारणे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे , आमदार श्रीकांत भारती, आमदार उमा खापरे, आमदार श्रीकांत भारती, खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या मातोश्री, रुक्मीणी मोहोळ, माजी आमदार अश्विनी जगताप, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे , जेष्ठ नेते नाना काटे, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, भाऊसाहेब भोईर, संदीप कस्पटे , आरती चोंधे , सुनिता तापकीर, चंद्रकांत नखाते, सविता खुळे , शेखर चिंचवडे, प्रशांत शितोळे, विलास मेडगिरी, माजी महापौर नितिन आप्पा काळजे, नगरसेविका ममता गायकवाड, नगरसेविका अश्विनी वाघमारे, ह.भ.प लहु महाराज जमदाडे ह.भ.प शेखर जांभुळकर, ह.भ.प. महादेव महाराज भुजबळ, A.C.P. सुनिल कुऱ्हाडे साहेब, हिंजवडी पोलिस वरिष्ठ पोलीस निरिक्षक बालाजी पांढरे साहेब, उपमहाराष्ट्र केसरी, विशाल आप्पा कलाटे, युवा नेते संदीप पवार , युवा नेते चेतन भुजबळ, गणेश कस्पटे, संतोष पवार, पवार, विजय दर्शिले राजाभाऊ भुजबळ, मोहनदादा भुमकर, भारती विनोदे, रणजित कलाटे, विशाल वाकडकर, धनाजी मामा विनोदे, कुणाल वाकडकर , विक्रम वाघमारे, अंकुश कलाटे , सोमनाथ कलाटे, प्रकाश जमदाडे, अंकुश भुजबळ, तेजस्वीनी ढोमसे, विक्रम विनोदे , अमर भूमकर, योगेश बाबर, रुपेश कलाटे, संजय भुजबळ, विश्वजित बारणे , अमित दर्शिले, विनोद कलाटे , तुषार देवकर, सागर भुमकर आदी उपस्थित होते.

## देहूरोड कँटॉन्मेंट बोर्ड येथील

# संरक्षण दलाच्या जवानांचा अग्निशमनच्या सरावात सहभाग

### आगीचे प्रकार, त्वरित रिस्पॉन्स, रेस्क्यूबाबत प्रशिक्षण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देहूरोड कँटॉन्मेंट बोर्ड येथील संरक्षण दलाच्या जवानांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील मुख्य अग्निशमन केंद्राला नुकतीच भेट दिली. ही भेट देण्यामागे अग्निशमन विभागाचे कामकाज जाणून घेणे, अग्निशमन विभागाच्या गाड्या तसेच इतर संसाधनांची माहिती घेणे आणि अग्निशमन विभागाच्या जवानांसोबत सराव करणे हा मुख्य उद्देश होता.**



**उत्पादने :** अग्निशमन विभाग कशाप्रकारे काम करतं हे जवळून जाणून घेण्यासाठी संरक्षण दलाचे ६० जवान उपस्थित होते.

अग्निशमन विभागातर्फे वरिष्ठ अधिकारी गौतम इंगवले यांनी उपस्थित जवानांना विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. यासोबतच मॉक ड्रिलचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. आगीचे प्रकार, त्वरित रिस्पॉन्स, रेस्क्यू अशा गोष्टींचे प्रशिक्षण यावेळी जवानांनी घेतले.

अग्निशमन विभागाकडे असलेल्या संसाधनांची माहिती सुद्धा जवानांना देण्यात आली. विभागातील गाड्या कशा पद्धतीने कार्य करतात, त्यांच्या उपयोग कशा प्रकारे केला जातो, त्याच प्रमाणे फायर सूट, होज रील पाइप अशा इतर साधनांची ही ओळख जवानांना करून देण्यात आली. संरक्षण दलाच्या देहूरोड संस्थांनामार्फत या कमांड फायर फायटिंग कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेक अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

> देशाच्या रक्षणासाठी सैन्य आणि अग्निशमन विभागाचे जवान नेहमीच कार्यरत असतात. सैन्य देशाच्या शत्रूला रोखते आणि अग्निशमन विभाग आपत्कालीन परिस्थिती सांभाळते. अग्निशमन विभागाच्या कार्याचे स्वरूप, त्याचे महत्व जाणून घेण्यासाठी जवानांनी विभागाला दिलेली भेट अतिशय महत्वाची आहे. दोन्ही विभागांची कार्यप्रणाली वेगवेगळी असली तरी देशसेवेचा उद्देश मात्र एकच आहे.
>
> **–विजयकुमार खोराटे,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> अग्निशमन विभागची कार्यपद्धतीने जाणून घेण्यासाठी आणि प्रशिक्षण घेण्यासाठी संरक्षण दलाच्या जवानांनी अग्निशमन विभागाला दिलेली ही प्रत्यक्ष भेट महत्वपूर्ण आहे. जवानांना कोणत्याही क्षणी आपत्कालीन परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो, अग्निशमन विभागासोबत त्यांनी घेतलेले प्रशिक्षण हे त्यांच्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.
>
> **–व्यंकटेश दुर्वास,**
> उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> अग्निशमन विभागाचे जवान आणि भारतीय सैन्याचे जवान हे अनेक संकटांना सामोरे जातात. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हे जवान नेहमीच सिद्ध असतात. अतिशय उत्साही वातावरणात हे प्रशिक्षण सत्र पार पडले. जवानांनी अतिशय काळजीपूर्वक सर्व माहिती जाणून घेतली. अशा पद्धतीचे प्रशिक्षण सत्र वारंवार होत रहावेत, यासाठी आम्ही अधिक प्रयत्न करू.
>
> **–ऋषिकांत चिपाडे,**
> अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.

जीवनशैली सुधारणा

## ‘हिंजवडी आयटी पार्क’ समस्यामुक्त करण्यासाठी उपाययोजना

### सार्वजनिक वसाहत व वाहतूक सुरक्षेबाबत आढावा बैठक : PMRDA आणि PCPC चा सकारात्मक पुढाकार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी आणि अपघाती घटनांच्या वाढत्या प्रमाणावर चिंता व्यक्त करत ‘UNCLOG HINJAWADIITPARK’ आणि संबंधित संघटनांच्या विनंतीनुसार PMRDA ने महत्त्वाची बैठक आयोजित केली. या बैठकीला PMRDA, PCMC, MIDC, MSEDCL, PWD, NHAI आणि IT कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**




बैठकीचे मुख्य उद्दिष्ट हे हिंजवडी आणि वाकड भागातील वाहतूक सुरक्षेबाबतच्या समस्यांचा आढावा घेणे आणि सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचवणे होते. तसेच, १० जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री आणि अन्य अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेवरील पुढील कार्यवाहीवर देखील विचारविनिमय झाला.

बैठकीत घेतलेले मुख्य निर्णय:

सूर्या हॉस्पिटल बायपास: हिंजवडी आयटी पार्कच्या रचनात्मक बदलांसाठी “५ पट नुकसानभरपाई” मॉडेलवर चर्चा झाली. यामुळे रस्ते सुधारणा आणि भूसंपादनाची प्रक्रिया सुलभ होईल.

हिंजवडी रस्ता व मेट्रो: हिंजवडीच्या मुख्य रस्त्याच्या ६-लेन विस्ताराबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच, मेट्रो मार्गाच्या डांबरीकरणाच्या कामाची प्रगती, तसेच खड्डे भरून काढण्याचे काम पुढील काही दिवसांत पूर्ण करणे आवश्यक ठरले.

अपघातांची जबाबदारी: आगामी काळात अपघाती मृत्यूंच्या घटनांमध्ये निष्काळजीपणाच्या दोषावर MIDC, PMRDA, PWD आणि मेट्रो अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्याचा निर्णय घेतला गेला.

वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त उपकरणे: PMRDA ने PCPC वाहतूक पथकासाठी मेटल डिव्हायडर्स, CCTV कॅमेरे आणि वाहतूक सिग्नलसाठी बजेट मंजूर करण्याचे वचन दिले.

अरुंद रस्ते आणि अपघातांची कारणे: हिंजवडीतील अरुंद रस्त्यांचा मुद्दा गंभीर मानला गेला आणि यावर भूसंपादन व अतिक्रमण हटवण्याचे ठरले.

साथच, UNCLOG HINJAWADIITPARK आणि ‘वाकड-पिंपरी चिंचवड रहिवासी विकास आणि कल्याणकारी संघटना’ यांच्या वतीने सचिन लोंढे यांनी स्कायवॉक कनेक्टिव्हिटी आणि लास्ट-माइल कनेक्टिव्हिटी यावर दोन औपचारिक विनंती पत्रे सादर केली आहेत. या प्रस्तावांमध्ये सौरऊर्जेवर चालणारे स्कायवॉक आणि फीडर बसेस तसेच शेअरिंग ऑटोरिक्षा सुरू करण्याचे आवाहन केले गेले आहे.

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs: Robotics Dance, Music, Speech & Drama Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune